पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २३ फेब्रुवारी २०२४

# विवेकानंद महाविद्यालयात 'इंटरनेट ऑफ थिंग्स' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयामध्ये सीनिअर इलेक्ट्रॉनिक्स व बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स एंटायर इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत 'एम्बेडेड सिस्टीम आणि इंटरनेट ऑफ थिंग्स' विषयावर व्याख्यान झाले.

प्रसंगी इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ. एस. ए. शिंदे 'आयओटी' यांनी तंत्रज्ञानाच्या कार्यपद्धतीने विश्लेषण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार होते. आयओटीची उपयोगिता सांगताना आरोग्यसेवा, कृषी, स्मार्ट शहरे, औद्योगिक ऑटोमेशन क्षेत्रातील वापर व त्या अनुषंगाने त्याच्या सकारात्मक परिणामांची आकडेवारीसह माहिती दिली. इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एन. पी. मोटे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन डॉ. पूनम पाटील यांनी केले. प्रा. बागडे यांनी आभार मानले.

23/02/24

23.2.24